<u>अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-२०१६</u>
महानगरपालिका/नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान. लेखाशीर्ष वाय-२, २२१५, (२२१५ १६४७) (वेतनेत्तर)

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-१४१६/प्र.क्र.०३/पापु-२४
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १९ जानेवारी, २०१६

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-१३१५/नपापुयो/प्र.क्र.२७/ पापु-२४, दिनांक १ जून, २०१५
२) शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा १३१५/ प्र.क्र.२७/पापु-२४, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५
३) शासन शुध्दिपत्र क्रमांकः मजीप्रा-१३१५/प्र.क्र.२७/पापु-२४, दिनांक २३ डिसेंबर, २०१५
४) शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-१३१५/प्र.क्र.९७/पापु-२४, दिनांक ८ जानेवारी, २०१६

<u>प्रस्तावना</u>

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता विधीमंडळाने मंजूर केलेल्या अनुदानाच्या तरतूदींच्या अनुषंगाने नागरी भागातील पाणी पुरवठा कार्यक्रम, या योजनांतर्गत कार्यक्रमाखालील नागरी नळ पाणी पुरवठा योजनेतील महानगरपालिका/नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान (२२१५ १६४७), या कार्यक्रमाकरीता, रु.८०,००,००,०००/- इतक्या मंजूर नियतव्ययापैकी रु.५६,००,००,०००/- एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. रु. ५६,००,००,०००/- इतक्या अर्थसंकल्पीत अनुदानापैकी वित्त विभागाकडून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BDS) वितरणासाठी रु. ३९,२०,००,०००/-एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या अनुदानातून उपरोक्त नमूद क्र. १, २ व ४ च्या शासन निर्णयान्वये एकूण रु. ३९,१९,५०,४३०/- एवढे अनुदान संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था बेलापूर, नवी मुंबई यांना वितरीत व मुक्त करण्यात आले आहे. अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रु. ३९,२०,००,०००/- एवढया अनुदानातून रु. ३९,१९,५०,४३०/- एवढे अनुदान वजा जाता रु. ४९,५७०/- इतके अनुदान अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरणासाठी शिल्लक आहे.

२. सदर योजनेसाठी मंजूर नियतव्यय असलेल्या रु. ८०,००,००,०००/- इतक्या निधीपैकी अर्थसंकल्पीत रु. ५६,००,००,०००/- वजा जाता उर्वरित विनाअर्थसंकल्पीत असलेला रु.२४,००,००,०००/- इतका निधी डिसेंबर, २०१५ च्या अधिवेशनात सन २०१५-१६ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्राद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु. २४,००,००,०००/- इतक्या निधीपैकी ५० % म्हणजे रु.१२,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरणासाठी वित्त विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर एकूण उपलब्ध असलेल्या रु. १२,००,४९,५७०/- (रुपये बारा कोटी एकोणपन्नास हजार पाचशे सत्तर फक्त) एवढया अनुदानातून रु.११,९८,१३,०००/- (रुपये अकरा कोटी अठ्यानव लाख तेरा हजार फक्त) एवढे अनुदान मुक्त व वितरीत करण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

राज्यातील नागरी क्षेत्रातील नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, या कार्यक्रमाखालील महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियांन योजनांचे कार्यान्वयन पाणी व स्वच्छता सहाय संस्था यांचेकडून करण्यात येते.

२. सदर नागरी पाणी पुरवठा योजनांच्या कार्यान्वयनाकरीता सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात, **<u>मागणी क्रमांक वाय-२, २२१५, १९२,महानगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना- (०२)(०२) महानगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, लेखाशिर्ष २२१५१६४७, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर)</u>** या कार्यक्रमाखाली रु.८०,००,००,०००/- इतक्या मंजूर नियतव्ययापैकी रु.५६,००,००,०००/- एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. रु. ५६,००,००,०००/- इतक्या अर्थसंकल्पीत अनुदानापैकी वित्त विभागाकडून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BDS) वितरणासाठी रु. ३९,२०,००,०००/-एवढे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर योजनेसाठी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या अनुदानातून उपरोक्त नमूद क्र. १, २ व ४ च्या शासन निर्णयान्वये एकूण रु. ३९,१९,५०,४३०/- एवढे अनुदान संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांना वितरीत व मुक्त करण्यात आले आहे.

३. सदर योजनेसाठी मंजूर नियतव्यय असलेल्या रु. ८०,००,००,०००/- इतक्या निधीपैकी अर्थसंकल्पीत रु. ५६,००,००,०००/- वजा जाता विनाअर्थसंकल्पीत असलेला रु. २४,००,००,०००/- इतक्या निधीपैकी डिसेंबर,२०१५ च्या अधिवेशनात सन २०१५-१६ या वर्षाचे खर्चाचे पुरक विवरणपत्राद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु.२४,००,००,०००/- इतक्या निधीपैकी ५०% म्हणजे रु.१२,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वित्त

विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. आता अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर एकूण उपलब्ध असलेल्या रु. १२,००,४९,५७०/- (रुपये बारा कोटी एकोणपन्नास हजार पाचशे सत्तर फक्त) एवढया अनुदानातून रु.११,९८,१३,०००/- (रुपये अकरा कोटी अठ्यानव लाख तेरा हजार फक्त) एवढे अनुदान संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांना खालील अटींच्या अधीन राहून सशर्त मुक्त व वितरीत करण्यात येत आहे. या मुक्त तरतुदीचे वाटप सोबतच्या विवरणपत्र-ब मध्ये दर्शविण्यात आले आहे.

- सदर अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत. शासनाच्या निदेशानुसार सदर अनुदान नागरी संस्थांना वितरीत करण्यात यावे.
- अनुदानाची रक्कम ज्याकरीता मंजूर व मुक्त करण्यात आली आहे, त्या विनिर्दिष्ट प्रयोजनाकरीताच दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत खर्च करावी.
- या मुक्त अनुदानातून होणा-या वाटपाची माहिती पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने शासनाला कळवावी.
- सदर अनुदानातून पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने सदर योजनांकरिता केलेल्या खर्चाचे लेखे तपासणीचे अधिकार महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर यांना किंवा खास अधिकार दिलेला या विभागातील अधिकारी यांना देण्यात येत आहेत. याबाबत संबंधित कागदपत्रे, महालेखापाल किंवा खास अधिकार दिलेला विभागातील अधिकारी यांनी मागणी केल्यास पाणी व स्वच्छता सहाय संस्थेने त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावीत.
- मुंबई वित्तिय नियम, १९५९ मधील जोडपत्र-२ मधील नियम क्रमांक ३ अनुसार महालेखापालांच्या मागणीनुसार प्राधिकरणाचे लेखे संबंधित कागदपत्रांसह निरीक्षणाकरिता, पाणी व स्वच्छता सहाय संस्थेने महालेखापालांना सादर करावेत.
- पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेला शासनाकडून जी अनुदाने प्राप्त झालेली आहेत किंवा जी अनुदाने यापुढील कालावधीत प्राप्त होतील त्या अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेने द्यावयाची आहेत. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था यांनी उपयोगिता प्रमाणपत्रात दर्शविलेल्या मंजूर व मुक्त अनुदानाच्या व खर्चाच्या कार्यक्रमनिहाय रकमा प्रमाणित करुन स्वाक्षरीत कराव्यात. त्या उपयोगिता प्रमाणपत्रावर उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी प्रतिस्वाक्षरी करावी, अशी प्रमाणपत्रे शासनाला स्विकारार्ह होतील.
- सदर अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात शासनाला सादर करावे तसेच उपयोगिता प्रमाणपत्राच्या प्रती महालेखापालांनाही पाठवाव्यात.
- सदर अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा आणि विहित अहवाल विहित दिनांकास, लेखा अधिकारी, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२ यांच्याकडे सादर करावा.
- या शासन निर्णयान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन,बेलापूर, नवी मुंबई यांना मुक्त करण्यात आलेला निधी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,

सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. हा निधी उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. बी.के.सवाई, संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई यांना तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून श्री. शां.सि.कुदळे, उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांनी या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेली रक्कम उपकोषागार कार्यालय, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयातून आहरित करुन सदर रक्कम ही एनईएफटी (NEFT) प्रणालीद्वारे पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या खाती जमा करण्यात यावी.

४. या वितरीत केलेल्या अनुदानातून होणारा खर्च, मागणी क्रमांक वाय-२, २२१५, १९२,महानगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना- (०२)(०२) महानगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, २२१५१६४७, ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१५-१६ या आर्थीक वर्षासाठी मंजूर तरतूदीतून भागवावा.

५. प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्ठातील अ.क्र. ९ मधील प्रत्येक अटींची पूर्तता झालेली आहे.

६. सदर शासन निर्णय हा वित्तीय अधिकार नियम पुस्तीका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-तीन, अ.क्र.५, परिच्छेद क्र. २७ (२) अन्वये विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१६०११९१०२९३०९४२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: CN = Sunil Jairam Tumram, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2016.01.19 12:20:45 +05'30'

सु.ज.तुमराम
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) ओल्ड सी. जी. ओ. इमारत, न्यू मरीन लाईन्स, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई - ४०० ०२०.

२) महालेखापाल, महाराष्ट्र- २, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) भारतीय लेखा व लेखापरीक्षा विभाग कार्यालय, सिव्हिल लाईन्स, वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर - ४४० ००१.

३) नियंत्रक अधिकारी तथा उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई-४००००१

४) आहरण व संवितरण अधिकारी तथा संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४०० ०६१ (५ प्रतीसह)

५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे

६) उप कोषागार अधिकारी, कोकणभवन, बेलापूर, नवी मुंबई.

७) वित्त विभाग, कार्यासन क्रमांक व्यय- ३, बीयुडी- १८, अर्थोपाय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) नियोजन विभाग, कार्यासन क्रमांक १४४३, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,कार्यासन क्रमांक पापु-०४,०६,०९,१३,१७,१८,२०,२२ मंत्रालय, मुंबई-४०० ००१

१०) ग्रंथालय, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ६ वा मजला, विधानभवन, मुंबई ४०० ०३२.

११) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. (५ प्रतींसह)

१२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, संगणक शाखा, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.

१३)निवडनस्ती (पापु-२४)

शासन निर्णय क्रमांक,मजीप्रा-१४१६/प्र.क्र.०३/पापु-२४, दिनांक :- १९ जानेवारी,२०१६ सोबतचे

विवरणपत्र-अ

अ. क्र.	आर्थिक लेखाशिर्ष	सन २०१५-१६ या आर्थीक वर्षातील अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी	डिसेंबर,२०१५ च्या अधिवेशनात सन २०१५-१६ या वर्षाचे खर्चाचे पुरक विवरणपत्राद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी	सन २०१५-१६ या आर्थीक वर्षातील अर्थसंकल्पीत करण्यात आलेला एकूण निधी	वित्त विभागाकडून अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर आतापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतूद	अर्थसंकल्पीय वितरण प्रणावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या एकूण तरतूदीपैकी आतापर्यंत वितरीत करण्यात आलेले अनुदान	या शासन निर्णयाद्वारे वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७	८
१	मागणी क्रमांक वाय-२, २२१५, १९२,महानगरपालिका/ नगर परिषदांना सहाय्य (०२) राज्य योजना- (०२)(०२) महानगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणीपुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी सहाय्यक अनुदान, २२१५१६४७, ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)	५६,००,००,०००/-	२४,००,००,०००/-	८०,००,००,०००/-	५१,२०,००,०००/-	३९,१९,५०,४३०/-	११,९८,१३,०००/-
	एकूण	**५६,००,००,०००/-**	**२४,००,००,०००/-**	**८०,००,००,०००/-**	**५१,२०,००,०००/-**	**३९,१९,५०,४३०/-**	**११,९८,१३,०००/-**

Sunil Jairam Tumram
Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: CN = Sunil Jairam Tumram, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2016.01.19 12:21:23 +05'30'

सु.ज.तुमराम
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

शासन निर्णय क्रमांक,मजीप्रा-१४१६/प्र.क्र.०३/पापु-२४, दिनांक :- १९ जानेवारी,२०१६ सोबतचे

विवरणपत्र-ब

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत महानगरपालिका/नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनांसाठी अनुदानाचे वाटप

अ.क्र.	योजनेचे नांव	वितरीत करावयाचे अनुदान
१	नगरपरिषद कळमेश्वर, जि. नागपूर	३६,५३,०००/-
२	नगरपरिषद बारामती, जि. पुणे	३,४२,१६,०००/-
३	नगरपरिषद मलकापूर, जि.बुलढाणा	४५,५०,०००/-
४	नगरपरिषद पाचोरा, जि.जळगांव	५९,९५,०००/-
५	नगरपरिषद त्र्यंबक, जि.नाशिक	२४,९२,०००/-
६	नगरपरिषद नांदूरा, जि.बुलढाणा	२३,१८,०००/-
७	नगरपंचायत माहूर, जि.नांदेड	४,४४,५५,०००/-
८	नगरपरिषद परळी वैजनाथ, जि. बीड	१,११,३२,०००/-
९	नगरपरिषद मुरुड जंजिरा, जि.रायगड	२७,३३,०००/-
१०	नगरपरिषद शेंदूरजनाघाट, जि. अमरावती	१८,८५,०००/-
११	नगरपरिषद मुल, जि.चंद्रपूर	६३,८४,०००/-
एकूण - ११ नगरपरिषदा		**११,९८,१३,०००/-**

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: CN = Sunil Jairam Tumram, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2016.01.19 12:21:55 +05'30'

सु.ज.तुमराम

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन